Price : Rs. 20/-

MACCIA ESTD 1927
Apex Chamber Of The State

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

June 2016 VOL. XXXXVII NO. 3



- महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष श्री. दिग्विजय कापडिया यांची मध्य रेल्वेच्या क्षेत्रिय रेल्वे सल्लागार समितीवर निवड झाली.
- महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य श्री. प्रमोद शहा यांची द इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनीस्ट्रेशन - महाराष्ट्र विंग या संस्थेच्या कार्यकारिणी सदस्यपदी २ वर्षासाठी बिनविरोध निवड झाली.
- चेंबरचे कार्यकारिणी सदस्य श्री. सतीश बूब यांची ऑल इंडिया फेडरेशन ऑफ टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन या अखिल भारतीय कर सल्लागार संघटनांच्या शिखर संस्थेच्या पश्चिम विभागाच्या व्यवस्थापन समिती सदस्यपदी नेमणूक झाली. श्री. बूब हे नाशिक टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशचे अध्यक्ष होते व राज्य पातळीवरील विविध कर सल्लागार संघटनांवरही त्यांनी विविध पदे भूषवली आहेत.

## शोकवार्ता - श्रद्धांजली

- महाराष्ट्र चेंबरच्या कार्यकारिणी समितीच्या सदस्या अंजली पाटकर यांचे पती प्राध्यापक श्री. प्रकाश पाटकर यांचे अकस्मित निधन झाले. त्यांनी ३३ वर्षे रामनाथ पोद्दार कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्सचे प्राध्यापक म्हणून काम केले होते.
- महाराष्ट्र चेंबरचे कोल्हापूर येथील कार्यकारिणी सदस्य आणि किराणा व भुसार व्यापारी असोसिएशनचे कोल्हापूरचे उपाध्यक्ष श्री. रमेश बनसोडे यांचे वयाच्या ६६ व्या वर्षी निधन झाले.
- चेंबरचे मालेगांवचे कार्यकारिणी सदस्य श्री. अजयकुमार शाह यांच्या मातोश्री श्रीमती महानंदा सुभाष शाह यांचे १७ सप्टेंबर २०१५ रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले.
- महाराष्ट्र चेंबरचे जळगांव येथील कार्यकारिणी सदस्य श्री. मधुसूदन राणे यांचे अकस्मित निधन झाले. श्री. मधुसूदन राणे हे गेल्या अनेक वर्षापासून चेंबरशी संलग्न होते. चेंबरच्या कार्यकारिणी मंडळातही ते सक्रिय होते. चेंबरचे कार्य उत्तर महाराष्ट्र विभागात वाढविण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. चेंबरच्या पदाधिकाऱ्यांनी उत्तर महाराष्ट्र विभागात केलेल्या दौऱ्यात त्यांनी संपूर्ण जबाबदारी उचलून दौरा यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहकार्य केले होते.
- चेंबरचे माजी उपाध्यक्ष श्री. विश्वजित डहाणूकर यांच्या मातोश्री सौ. नंदीनी भारत डहाणूकर यांचे २३.११.२०१५ रोजी निधन झाले. अतिशय दानशूर, मनमिळावू स्वभाव व सर्वांना मदत करायची वृत्ती यामुळे त्या सर्वपरिचित होत्या.
- महाराष्ट्र चेंबरचे मुंबई येथील कार्यकारिणी सदस्य श्री. भद्रकुमार बांगडीवाला यांचे वडील श्री. श्रीमादलाल बांगडीवाला यांचे २६ डिसेंबर २०१५ रोजी वयाच्या ९९ व्या वर्षी निधन झाले.
- जळगांव येथील जैन उद्योग समूहाचे संचालक आदरणीय पद्मश्री. डॉ. भवरलालजी जैन यांचे निधन झाले. डॉ. भवरलालजी ऊर्फ भाऊ यांनी जिद्द आणि कष्ट यातून स्वत:ची ओळख निर्माण केली. श्री. भाऊ यांनी ठिबक सिंचन पद्धती लोकप्रिय केली. त्यांच्या या कार्याबद्दल दोन आंतरराष्ट्रीय पुरस्कार व सन २००८ मध्ये पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाला.
- महाराष्ट्र चेंबरचे नागपूर येथील कार्यकारिणी सदस्य व प्रसिद्ध उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते श्री. अमर वझलवार यांच्या पत्नी सौ. वैजयंती वझलवार यांचे १०.०२.२०१६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. कै. सौ. वझलवार या सिरॅमिक वस्तूंवर उत्कृष्ट नक्षीकाम करीत. या कलाकृतींना भारतात मोठी प्रसिद्धी मिळाली होती, तसेच लंडन येथे १९८६ साली आयोजित प्रदर्शनातही त्यांच्या या कलाकृतींना वाखाणण्यात आले होते.
- महाराष्ट्र चेंबरचे मराठवाडा विभागातील माजी उपाध्यक्ष आणि वेलवर्थ ग्रुपचे श्री. वसंत हौजवाला यांचे दि. २५ जानेवारी २०१६ रोजी निधन झाले. कै. हौजवाला हे मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स, मराठवाडा व्यापारी महासंघ, केमिस्ट-ड्रगिस्ट असोसिएशन आदी संस्थांचे माजी अध्यक्ष होते. मराठवाड्याच्या आर्थिक विकासासाठी त्यांनी मोठे योगदान दिले आहे.